**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे शहर

## मिसींग झालेला मोबाईल पोलीसांनी शोधून काढला.

आशिष अशोक बच्चल, रा.नरपतगिरी चौक, पुणे यांचा दि.२६/१०/२०१८ रोजी सॅमसंग एस-९ प्लस मोबाईल ४८ हजार रूपये किंमतीचा साऊथ मेन रोड, कोरेगाव पार्क येथे पडून गहाळ झाल्याने, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग एल आर नं.१९०३१०२०१८ अन्वये दि.२६/१०/२०१८ रोजी नोंद केली.

नमूद सॅमसंग एस-९ प्लस मोबाईल संदर्भात दिलेल्या मिसींगची माहिती पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी घेवून सदर मोबाईलचा आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावला. सदर तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा मोबाईल हा इसम नामे महेंद्र नामदेव कुमकर, रा.राजाराम गॅस एजन्सी, विदयापीठ चौक, पुणे यांचे ताब्यात असल्याचे समजून आल्याने, त्यांचेशी संपर्क करून मोबाईल ताब्यात घेवून, तो आशिष अशोक बच्चल यांना परत केलेला आहे. अशा प्रकारे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढलेला आहे. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार यांनी पोलीसांना मनापासून धन्यवाद दिले.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे